# Atlas Copco व्यवसाय भागीदार होण्यासाठी चे निकष

## प्रस्तावना

Atlas Copco हा शाश्वत उत्पादकता असलेली उत्पादने आणि सेवा देणारा जागतिक पातळीवरील एक अग्रगण्य उद्योग समूह आहे. हा उद्योग समूह ग्राहकांना आपल्या अभिनव कॉम्प्रेसर, व्हॅक्यूम सोल्यूशन्स, जनरेटर, पंप, वीज साधने आणि असेंब्ली प्रणालीद्वारे सेवा देतो. Atlas Copco उत्पादकता, ऊर्जा कार्यक्षमता, सुरक्षा आणि कार्याभ्यास यावर केंद्रित उत्पादने आणि सेवा विकसित करतो. कंपनीची स्थापना 1873 मध्ये झाली, स्टॉकहोम स्वीडन मध्ये स्थित असून तिची जागतिक व्याप्ती 180 पेक्षा अधिक देशांपर्यंत पोहोचणारी आहे.

समूहाचा दृष्टिकोन त्यांचे ग्राहक, पुरवठादार आणि इतर व्यवसाय भागीदार आणि इतर भागधारकांसाठी First in Mind – First in Choice® असणे हा आहे. हे साध्य करण्यासाठी Atlas Copco Group चा हेतू हा त्यांच्या सामाईक मूलभूत आणि नैतिक मूल्यांवर आधारित व्यवसाय पद्धतीने काम करून अशा व्यवसाय भागीदारांसोबत काम करण्याचा आहे जे कि आपल्याप्रमाणेच या मूल्यांच्या आधारावर व्यवसाय करतात

**Atlas Copco च्या व्यावसायिक आचारसंहिते[1] मध्ये असे म्हटले आहे कि :**

- "आम्ही पुरवठादार, उपकंत्राटदार संयुक्त सहयोग भागीदार, एजंट आणि वितरक अशा आमच्या व्यवसायातील भागीदारांचे सर्वोत्तम सहयोगी बनण्याचा आणि ते आम्हाला प्राधान्य देतील अशा पद्धतीने काम करण्याचा सतत प्रयत्न करत असतो.
- आम्ही उत्पादकता, गुणवत्ता, वितरण, किंमत आणि विश्वासार्हतेसह पर्यावरणीय आणि सामाजिक कार्यप्रदर्शन आणि विकासासाठी प्रतिबद्धता या गुणांच्या आधारावर निष्पक्षपणे व्यावसायिक भागीदार शोधतो, मूल्यांकन करतो आणि निवडतो.
- आम्ही त्यांना आमच्या वचनबद्धतेची जाणीव करुन देतो आणि त्यांच्याकडून आमच्या धोरणांचे पालन व्हावे अशी अपेक्षा करतो."

या डौक्युमेंटचा हेतू, व्यवसायिक भागीदारांना Atlas Copco समूहाच्या नैतिक, सामाजिक, सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरणविषयक धोरणांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने थोडक्यात स्पष्टीकरण देणे असा आहे

**खालील निकष सूची Atlas Copco च्या व्यावसायिक आचारसंहिते वर आधारित आहे, जी समूहाद्वारे समर्थित खालील आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित आहे:**

- संयुक्त राष्ट्र आंतराष्ट्रीय मानवाधिकार विधेयक
- कार्यामध्ये मूलभूत तत्त्वे आणि अधिकारांवर ILO घोषणा (ILO)
- युनायटेड नेशन्स ग्लोबल कॉम्पॅक्ट (GC)
- बहुराष्ट्रीय उपक्रमांकरिता OECD मार्गदर्शक तत्त्वे

## सर्वसाधारण आवश्यकता

पुरवठादार, उपकंत्राटदार, संयुक्त सहयोग भागीदार, एजंट आणि वितरक अशा व्यवसायातील भागीदारांना व्यावसायातील आचारसंहितेनुसार समूहाच्या जबाबदार्या आणि अपेक्षा याबद्दल जागरूक केले जावे. व्यवसायातील भागीदार Atlas Copco Group ची उत्पादने किंवा सेवांच्या उत्पादनांसाठी उपकंत्राटदार वापरत असल्यास, त्यांच्या उपकंत्राटदारांचे मूल्यांकन करण्यास आणि ते निवडण्यासाठी समान तत्त्वे वापरण्याची त्यांची जबाबदारी आहे. विनंती केल्यास, व्यवसायातील भागीदाराने Atlas Copco ला सूचित करणे आवश्यक आहे की ते कोणते उपकंत्राटदार वापरतात.

व्यवसायातील भागीदारांनी, त्यांच्या सर्व कृतींमध्ये, ते ज्या देशांमध्ये कार्य करतात त्या देशांमध्ये लागू असलेल्या राष्ट्रीय कायदे आणि नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. या दस्तऐवजात कोणताही निकष राष्ट्रीय कायद्याच्या विरोधात असल्यास, नेहमी राष्ट्रीय कायद्याचे अनुसरण करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत व्यवसायातील भागीदाराने या दस्तऐवजावर स्वाक्षरी करण्याआधी Atlas Copco ला अशा विसंगती बद्दल ताबडतोब सूचित केले पाहिजे.

Atlas Copco च्या आवश्यकता राष्ट्रीय कायद्यामध्ये निर्धारित केलेल्या आवश्यकतांपेक्षा अधिक असू शकतात, अशा बाबतीत व्यवसायातील भागीदाराने Atlas Copco च्या अतिरिक्त आवश्यकतांचे पालन करणे आवश्यक आहे.

[1] http://www.atlascopcogroup.com/en/sustainability/our-sustainability-approach/our-business-code-of-practice

## व्यवसायातील भागीदाराचे निकष

1. **सर्व प्रकारच्या सक्तीचे आणि बळजबरीचे मजूरांचे निर्मूलन (GC 4, ILO 29)**
   व्यवसायातील भागीदार कोणतेही सक्तीने किंवा बळजबरीने श्रम करणारे मजूर नसावेत. हे कोणत्याही स्वरूपात सहन केले जाणार नाही. यात एखाद्या व्यक्तीने अनिच्छेने किंवा दंडाच्या धमकीअंतर्गत केलेले कोणतेही कार्य किंवा सेवा समाविष्ट आहे. हे व्यावसायिक भागीदारांना त्यांच्या कर्मचार्यांच्या रोजगारादरम्यान, त्यांचे पैसे किंवा मूळ दस्तऐवज जसे की पासपोर्ट, शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि यासारखी कागदपत्रे जमा करण्यावर देखील प्रतिबंध लावते.

2. **बालमजूरीला नकार (GC 5, ILO 138)**
   Atlas Copco बाल मजूरांचा स्वीकार करत नाही. ते रोजगारासाठीच्या कायदेशीर वयाच्या खाली असलेल्या कोणालाही कामावर घेत नाहीत हे सुनिश्चित करण्यासाठी व्यवसायातील भागीदारांना आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय करावे लागतात. याचा अर्थ असा नाही की जोपर्यंत स्थानिक कायद्यात जास्त वयोमर्यादा देत नाही, अनिवार्य शिक्षण पूर्ण करण्यासाठी वयापेक्षा कमी वयाच्या किंवा 15 वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींना (किंवा 14 जेथे ILO अधिवेशन क्र. 138 द्वारे परवानगी दिली आहे) रोजगार दिला जाऊ शकतो. अधिकृत अल्पवयीसाठी, व्यवस्थापन किमान लागू स्थानिक कायद्यासह कामाची स्थिती, कामाचे तास आणि त्याच्या किंवा तिच्या वयासाठी उपयुक्त वेतन प्रदान करण्यासाठी जबाबदार आहे. धोकादायक कार्यासाठी किमान वय 18 वर्षे आहे.

3. **प्रामाणिकपणा (GC 10, OECD 9)**
   व्यवसायातील भागीदार खंडणी व लाचखोरीसहित, सर्व प्रकारच्या भ्रष्टाचाराविरुद्ध काम करावे. ते बनावट दस्तऐवज किंवा अन्य बेकायदेशीर कार्ये किंवा अघोषित उत्पादन युनिट किंवा पुरवठादार यांचा वापर करू शकत नाहीत. आम्हाला एक सहकारी व्यवस्थापन आणि उत्पादन सुविधांसह, व्यवसायातील भागीदाराच्या आवारामध्ये मुक्त प्रवेश आवश्यक आहे. व्यवसायातील भागीदारांनी योग्य प्रतिस्पर्धेमध्ये त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी करावी आणि प्रतिस्पर्धी, किंमत शेअरिंग किंवा इतर तत्सम गोष्टींशी संबंधित चर्चा किंवा करारांमध्ये प्रवेश न करण्यास सहमत असावे.

4. **मानवी अधिकारांचे समर्थन आणि आदर (GC 1 आणि GC 2)**
   व्यवसायातील भागीदारांनी मानवी हक्कांचे संरक्षण आणि समर्थन करणे आवश्यक आहे. त्यांना हे सुनिश्चित करण्यास सक्षम व्हायचे आहे की ते मानवीय हक्कांच्या दुरुपयोगात सहभागी नाहीत आणि त्यांना Atlas Copco Group द्वारा समर्थित मुख्य आंतरराष्ट्रीय नैतिक मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे.

   Atlas Copco ने विनंती केली असल्यास, व्यवसायातील भागीदार जे भाग, उत्पादने किंवा कच्चा माल पुरवतात ज्यामध्ये एक किंवा अधिक 'कॉंनफ्लिट मिनरल्स'[2] आणि संघर्षग्रस्त आणि उच्च-धोका असलेल्या देशांकडील स्त्रोत समाविष्ट आहे, OECD निहित परिश्रम तत्त्वांनुसार कार्य करण्यास सहकार्य करण्यासाठी तयार असणे आवश्यक आहे.

5. **रोजगार आणि व्यवसाय संदर्भात भेदभाव निर्मूलन (GC 6, ILO 111)**
   व्यवसायातील भागीदारांनी समान संधी, निष्पक्षता आणि विविधतांचे समर्थन केले पाहिजे आणि कठोरपणे हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की सर्व कर्मचार्यांना कोणत्याही रोजगार निर्णयांमध्ये त्यांच्या क्षमता आणि योग्यता यांवर आधारित, जातीय समूह, धर्म, लिंग, वय, राष्ट्रीयत्व, अपंगत्व, वैयक्तिक संबंध, केंद्रीय सदस्यत्व आणि/किंवा राजकीय मत याची पर्वा न करता, वागवले पाहिजे.

6. **सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण, फॅक्टरीची स्थिती आणि गृहनिर्माण (ILO 115)**
   व्यवसायातील भागीदाराने प्रत्येक वेळी कर्मचार्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे. कार्य परिसर आणि फॅक्टरीची स्थिती अशी असणे आवश्यक आहे की कामगार त्यांचे कार्य सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण वातावरणात करू शकतात, ज्यात अग्निशामक प्रतिबंधनाचा समावेश आहे. धोके कमी करण्यासाठी, कर्मचारी आरोग्य आणि सुरक्षितता, प्रशिक्षण आणि स्पष्ट भूमिका वर्णनांसाठी योग्य धोरणे असणे आवश्यक आहे. कर्मचार्यासाठीची सुविधा व्यक्तींच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करणे आणि व्यक्तिगत स्वच्छता गरजा पूर्ण करणे आवश्यक आहे. व्यवसायातील भागीदारांनी त्यांच्या कर्मचार्यांच्या वतीने, सुरक्षा आणि कार्यस्थळ स्थितींमुळे उद्भवणारे अपघात आणि आजार टाळण्यासाठी योग्य कारवाई करणे आवश्यक आहे. यात उदाहरणार्थ, प्रथमोपचार उपकरणांची उपलब्धता समाविष्ट आहे.

7. **संघटनेचे स्वातंत्र्य आणि सामूहिक सौदा (कलेक्टिव्ह बार्गेनिंग) करण्याच्या अधिकाराची प्रभावी मान्यता (GC 3, ILO 87)**
   व्यवसायातील भागीदार हे सुनिश्चित करतात की त्यांचे कामगार कार्यस्थळातील आणि नुकसान भरपाईच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यवस्थापनाशी उघडपणे संवाद करण्यासाठी मुक्त आहेत. सामूहिक सौदाच्या (कलेक्टिव्ह बार्गेनिंग) उद्देश्यासाठी कामगार संघटनांनी प्रतिनिधित्व करायचे किंवा नाही हे निवडण्याचा अधिकार कर्मचार्यांना आहे. Atlas Copco अशा अधिकारांचा वापर करणार्या कोणत्याही कर्मचार्याविरूद्ध भेदभाव सहन करणार नाही.

8. **अधिक महान पर्यावरणीय जबाबदारीला प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार (GC 8, OECD 5)**
   व्यवसायातील भागीदारांची आदर्श पर्यावरणीय व्यवस्थापन प्रणाली किंवा किमान पर्यावरणीय धोरणाची किंवा यंत्रणा विकसित करण्यासाठीची कटिबद्धता असावी ज्यामुळे त्यांच्या स्वतःच्या पर्यावरणविषयक कामगिरीमध्ये सातत्याने सुधारणा होईल.

---

[2]सिक्युरिटीज आणि एक्स्चेंज कमिशनच्या परिभाषेनुसार कोलंबम-टॅंटालाइट (कोल्टन), कॅसिटरीटे, सोने, वोल्फ्रामेट किंवा त्यांचे डेरिवेटिव (टिन, टंगस्टन आणि टॅंटलम) कंफ्लिक्ट मिनरल्स आहेत

**9. पर्यावरणविषयक आव्हाने आणि पर्यावरणविषयक अनुकूल तंत्रज्ञानाचा विकास आणि प्रसार यासाठी सावधगिरीचा दृष्टिकोन (GC 7 आणि 9, OECD 5)**
व्यवसायातील भागीदारांनी त्यांच्या व्यवसायाला अशा प्रकारे चालवला पाहिजे की जे पर्यावरणाचे संरक्षण आणि जतन करते, उदाहरणार्थ, पाण्याचा वापर आणि सांडपाण्यावर प्रकिया करण्याकडे लक्ष देते. उत्पादने आणि सेवा विकसित करताना, व्यवसायातील भागीदारांनी उत्पादने आणि सेवांची निर्मिती, वितरण करताना आणि वापरताना तसेच त्यांच्या विल्हेवाटा दरम्यान नकारात्मक पर्यावरणीय प्रभावांना संबोधित आणि कमी करणे आवश्यक आहे. व्यवसायातील भागीदारांनी उत्पादन, प्रक्रिया आणि डिझाइनमध्ये पर्यावरणवादी अनुकूल तंत्रज्ञानाच्या विकासासाठी आणि प्रचारासाठी त्यांच्या वचनबद्धतेची पुष्टी करणे आवश्यक आहे.

**10. Atlas Copco प्रतिबंधित आणि घोषित केलेल्या सूचीचे[3] अनुपालन**
Atlas Copco उत्पादन प्रक्रियांमध्ये वितरित केलेले भाग, उत्पादने किंवा कच्चा मालांमध्ये न वापरले जाणारे पदार्थ प्रतिबंधित सूचीने ओळखतात. घोषित करता येण्याजोग्या सूचीमध्ये ज्या पदार्थांचा वापर मर्यादित असेल ते सामील आहेत आणि Atlas Copco ने वितरित केलेल्या वस्तूंमध्ये कोणत्याही सूचीबद्ध पदार्थांची सामग्री घोषित केली जाणे आवश्यक आहे. कॉनफ्लिट मिनरल्सदेखील घोषित करता येण्याजोग्या सूचीत समाविष्ट आहेत, स्पष्टतेसाठी निकष 4 पहा. व्यवसायातील भागीदारांनी या सूचींसह त्यांच्या अनुपालनाची पुष्टी करणे आवश्यक आहे, सूचीच्या अद्यतनांचे अनुसरण करा आणि समाविष्ट पदार्थांमध्ये समस्या असल्यास Atlas Copco ला सतर्क करा.

## अनुपालन आणि पाठपुरावा

येथे सूचीबद्ध असलेल्या सामाजिक, व्यावसायिक नैतिक मूल्यांचे आणि पर्यावरणविषयक निकषाचे व्यावसायिक भागीदारानी पालन करणे Atlas Copco ला आवश्यक आहे. व्यावसायिक भागीदार जे यांची अंमलबजावणी करण्यात सक्रिय आहेत किंवा जे आधीपासून या निकषांची पूर्तता करतात त्यांना भागीदारीसाठी प्राधान्य देऊन विचारात घेतले जाईल. समूह काटेकोरपणे निरीक्षण करेल आणि सर्वेक्षण आणि ऑडिटच्या माध्यमातून या निकषासह व्यवसायिक भागीदारांच्या पालनाचा पाठपुरावा करेल. उल्लंघन आढळल्यास Atlas Copco आपल्या व्यावसायिक संबंधांचे पुनरावलोकन देखील करेल आणि व्यवसायिक भागीदारांना त्वरित निकष पूर्ण करण्यासाठी किंवा बदलण्याची विनंती केली जाईल. व्यवसायिक भागीदार त्यांच्या आवश्यकता पूर्ण करण्याच्या प्रक्रियेमध्ये असल्यास आणि योजना तयार करण्यास इच्छुक असल्यास ते या दस्तऐवजात त्यांच्या वचनबद्धत्वेवर स्वाक्षरी करू शकतात.

Atlas Copco Group कंपन्यांनी त्यांच्या व्यवसायिक भागीदारांना वर नमूद केल्याप्रमाणे निकषासह त्यांचे पालन करत असल्याची सिद्धता करण्यासाठी पुरेसे दस्तऐवज व्यवस्थापित करणे आवश्यक आहे किंवा कृती योजना आराखड्याद्वारे त्यांचा निकषासह पालन करण्याचा उद्देश आणि इच्छा प्रदर्शित करणे आवश्यक आहे.Atlas Copco Group सह व्यवसाय करण्याची एक अट म्हणून, व्यवसायिक भागीदार आणि त्यांचे उपकंत्राटदारांनी Atlas Copco आणि त्याचे नियुक्त एजंट (तृतीय पक्षांसह) यांना ऑडिट करण्यासाठी अधिकृत करणे आवश्यक आहे.

.....................................................................................................................

(व्यवसायातील भागीदाराचे नाव)

ने Atlas Copco व्यावसायिक आचारसंहितेवर आधारित हे दस्तऐवज वाचले आहे आणि समजले आहेत आणि या दस्तऐवजातील सर्व निकष आणि आवश्यकतांचे पूर्णपणे पालन करण्यास वचनबद्ध आहे.

.....................................................................................................................

नाव | पद/कार्याचे शीर्षक

.....................................................................................................................

तारीख आणि स्थान | स्वाक्षरी

## अतिरिक्त संदर्भ

- सुरक्षितता आणि आरोग्यामध्ये ILO ची व्यावसायिक आचारसंहिता, http://www.ilo.org/safework/lang--en/index.htm
- ILO International Labor Standards, http://www.ilo.org/global/standards/lang--en/index.htm
- बहुराष्ट्रीय उपक्रमांसाठी OECD ची मार्गदर्शकतत्वे, www.oecd.org
- भ्रष्टाचारविरोधी संयुक्त राष्ट्र अधिवेशन http://www.unodc.org/unodc/en/treaties/CAC/index.html
- युनायटेड नेशन्स ग्लोबल कॉम्पॅक्ट, www.unglobalcompact.org
- संयुक्त राष्ट्र आंतराष्ट्रीय मानवाधिकार विधेयक, www.un.org
- ISO 14001, www.iso.org
- SA 8000, www.sa-intl.org

[3]प्रतिबंधित आणि घोषित करण्यायोग्य सूची Atlas Copco Group वेबसाइटवर उपलब्ध आहेत:
http://www.atlascopcogroup.com/en/sustainability/living-by-the-highest-ethical-standards/ethical-supply-chain